पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे - ४११ ०१८
कामगार कल्याण विभाग
जा.क्र./ का.क/ कावि /२८५/०६
दिनांक : ०४/०४/ २००६

विषय : कामगार कायद्यातील तरतूदीचे पालन करण्याबाबत.

संदर्भ :-
१) काक/३/कावि/ ३०१/२०००/ दि- ५/१०/२०००
२) काक /३/ कावि/ ४३८/२००० /दि . २४/१०/२०००
३) काक/३/कावि /४०१/ २०००/दि .२०/११/२०००
४) काक/३/कावि /४२१/२०००/दि . २८/११/२०००
५)काक /३/कावि/४५१/२०००/दि. ८/१२/२०००
६) काक/३/कावि / ६२१/२००४ /दि. ८/७/२००४
७) काक /३/कावि / ८११/२००४/दि.४/९/२००४
८) काक/३/कावि / ७२१/२००५ :/दि २६/७/२००५

परिपत्रक -

या परिपत्रकाद्वारे सर्व शाखा प्रमुख / शाखा अधिकारी यांना कळविण्यात येते की, महानगरपालिकेची सर्वच विकास कामे खाजगी कंत्राटदारा मार्फत करण्यात येतात. तसेच मनपाच्या सुरक्षा साफसफाई , उद्यानातील देखभाल, सार्वजनिक , शौचालयाची देखभाल व दुरूस्ती या सारख्या सेवा सार्वजनिक मंडळ, स्वयंसेवक, बेराजगारांच्या सहकारी सेवा संस्था , मजूर सहकारी संस्था, स्वयंसेवी संस्था , खाजगी ठेकेदार यांच्या मार्फत करून घेण्यात येतात. अशा संस्था वा कंत्राटदाराकडे २० पेक्षा अधिक कामगार काम करीत असतील तर त्यांना कंत्राटी कामगार कायदा १९७० कलम १२ अन्वये लायसन्स घेणे क्रमप्राप्त आहे. तसेच भविष्य निर्वाह निधी कायदा आणि राज्य कामगार विमा कायदा या अंतर्गत ही नोंदणी करून घेणे आवश्यक असते. त्याबाबतच्या नोंदणी आणि लायसन्स कंत्राटदारांनी घ्यावे म्हणून कामगार कल्याण विभागामार्फत उपरोक्त संदर्भिय परिपत्रक व पत्राद्वारे वेळो वेळी सूचना देण्यात येऊनही खात्ते प्रमुखा मार्फत कार्यवाही करून घेतली जात नाही. त्याचबरोबर महाराष्ट्र किमान वेतन कायदा १९४८ अन्वये वेगवेगळया अनुसूचित उद्योगाकरिता उदा. सुरक्षा,साफसफाई स्वतंत्र इमारती बांधकाम, दुरूस्ती उद्योग इत्यादींसाठी महाराष्ट्र शासनाच्या उद्योग कामगार ऊर्जा विभागामार्फत कुशल, अर्धकुशल, व अकुशल कामगार पर्यवेक्षकीय कामगारांचे किमान

वेतन निश्चित केले जाते. व त्या वेतनावर दर सहा महिन्यांनी विशेष भत्ता मंजूर केला जातो. व त्यावर घरभाडे भत्ता, भविष्य निर्वाह निधी, राज्य कामगार विमा, इत्यादी कायदेशीर लेव्ही, सार्वजनिक रजा वेतन, इत्यादी लाभासह वेतन देणे बंधनकारक असते. असे वेतन व कायदेशीर लेव्ही संदर्भात कायदा अथवा कामगार कल्याण विभागाकडून अभिप्राय येणे आवश्यक असतानाही काही विभागाकडून परस्पर निर्णय घेतले जातात. त्यामुळे काही कायदेशीर मुद्दे उपस्थित होवून नाहक सामाजिक कार्यकर्ते / संस्था / संघटना यांना तक्रारीस वाव मिळतो. व त्यामुळे काही वेळा न्यायालयीन प्रकरणे ही दाखल होतात.

तरी या परिपत्रकाद्वारे सर्व शाखा प्रमुख /शाखा अधिकारी यांना निर्देशित करण्यात येते की,

१. म.न.पा.ने नियुक्त केलेले ठेकेदार / आस्थापनामध्ये २० पेक्षा अधिक कामगार सभासद काम करीत असतील तर त्यांनी कंत्राटी कामगार कायदा १९७० कलम १२ अन्वये मा. अप्पर कामगार आयुक्त पुणे यांचेकडून लायसन्स घेणे बंधनकारक आहे. व अशा ठेकेदार / अस्थापनाचे पहिले बिल अदा करण्यापूर्वी लेखाशाखा/ संबंधित शाखा प्रमुखानी लायसन्स घेतले आहे. किंवा नाही याची खात्री करूनच पहिल्या बिलाची अदायगी बाबत कार्यवाई करावी. ठेकेदाराने लायसन्स घेतले असल्यास त्याची एक प्रत कामगार कल्याण विभागात कामगारांची यादी करारपत्रासह पाठविण्यात यावी. जेणे करून कामगार कल्याण विभागास कंत्राटी कामगार कायदा कलम ७ प्रमाणे म.न.पा. ने घेतलेले नोंदणी प्रमाणपत्र हे ठेकेदारांचे यादी व त्यांच्याकडे काम करणाऱ्या कामगारांच्या यादीसह मा. अप्पर कामगार आयुक्त यांच्याकडे वेळोवेळी नुतनीकरण (अमेंडमेंट) साठी सादर करणे शक्य होईल.

२. किमान वेतन कायदयातील तरतूदीनुसार निश्चित केलेले वेतन विशेष भत्ता आणि इतर कामगार कायदयातील म्हणजेच भविष्यनिर्वाहनिधी,राज्य कामगार निधी बोनस इत्यादी कायदयातील कायदेशीर लेव्हीसह येणारे वेतन , कायदा , अथवा कामगार कल्याण विभागाकडून निश्चित करून अभिप्राय घेवूनच निविदा / कोटेशन अभिप्राय द्वारे अंतिम करावीत. वेतन/ विशेष भत्ता संदर्भात वेळो वेळी होणारे बदला बाबतही कामगार कल्याण विभागाशी संपर्क साधावा.

३. कायदा/ कामगार कल्याण विभागाकडून कामगार कायद्यातील तरतूदीची अंमलबजावणी होते किंवा नाही. याची तपासणी वेळो वेळी करण्यात येईल. यासाठी त्यांना कागदपत्र उपलब्ध करून द्यावीत. तसेच त्यांच्याकडून संबंधित विभागाचे ठेकेसंदर्भात संबंधित अधिकाऱ्या समवेत पाहणी करून कागदपत्रांची छाननी करून कायदेशीर त्रुटी असल्यास दूर केल्या जातील.



5/5/06

४. भविष्यानिर्वाह निधी राज्य कामगार निधी, कर्मचारी कल्याण निधी, अंतर्गत कपात केलेली वर्गणी सेवा कर इत्यादी विविध कालावधीत संबंधित शासकीय खात्याकडे भरली जात आहे . किंवा नाही. याची खातरजमा दरमहा संबंधितानी करावी .

५. - कंत्राटी कामगार १९७० कलम २१ (२) अन्वये कायद्याने निर्धारित केलेले किमान वेतन व इतर कायदेशीर लेव्ही कंत्राटी कामगारांना दिल्या जातात किंवा नाही हे पाहण्याची कायदेशीर जबाबदारी ही प्रिन्सिपल एम्प्लॉयर म्हणून मनपाची आहे. म्हणून सर्वच ठेकेदाराकडे काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांचे वेतन हे उक्त कायदयातील तरतुदीनुसार हे मनपाचे प्रतिनिधी समोर दिले जावे. व हयाची खातरजमा संबंधित खाखा प्रमुखानी करावी.

६. ठेकेदारी पध्दतीने जी कामे दिलेली आहेत. अशा कामाचा व त्या कामासाठी नेमलेल्या कामगारांचा वेळो वेळी अपघात नुकसान भरपाई कायदयातील तरतूदीनुसार विमा उतरवून शासकिय विमा निधींकडे भरावा. या कायदया अंतर्गत जे कामगार येणार नाहीत त्या कामगारांची राज्य कामगार विमा योजने अंतर्गत वर्गणी कपातीची कार्यवाही करावी,. ज्या ठेकेदारांना काम दिले जाते त्यांचे काम सुरू झालेपासून ते काम संपेपर्यंत कंत्राटी कामगार कायदा कलम २५ (२) (८) अन्वये ठेकेदाराकडून दाखला घेण्यात यावा. व अंतिम बील अदा करण्यापूर्वी कोणा कामगारांची देणी राहिली आहे. किंवा नाही. यांचाही दाखला देवून अंतिम बिल अदा करावे.

उक्त कामगार कायद्यातील तरतूदीनुसार अत्यावश्यक मार्गदर्शक सूचनेप्रमाणे सर्व शाखा प्रमख / शाखा अधिकाऱ्यांनी यापुढे कार्यवाही करावी या संदर्भात काही कायदेशीर अडचण / अभिप्राय आवश्यक असल्यास वेळो वेळी कायदा / कामगार कल्याण विभागाकडून घ्यावेत. विविध कामगार कायदयातील तरतूदीचे अंमलबजावणी संदर्भात संबंधित अधिकाऱ्याकडून वेळेत कार्यवाही न झाल्याने काही कायदेशिर अडचणी निर्माण झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर त्यांची जबाबदारी राहील याची कृपया नोंद घ्यावी.

आयुक्त

पि.चि.म.न.पा. पिंपरी, पुणे - १८

सर्व शाखा प्रमुख / शाखा अधिकारी .